# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## ( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

### परिपत्रक क्र.२४२/२०२४

***विषय :- कर्मचाऱ्यांना सणानिमित्त उचल देण्यासंबंधी..***

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना सणानिमित्त खाली नमूद केलेल्या अटींवर उचल रक्कम मंजूर करण्यात येत आहे.

१) सणानिमित्तची उचल रक्कम वर्षातून फक्त एकदाच दिवाळी / नाताळ / बुध्द जयंती / ईद अथवा मा.कुलगुरू यांच्या संमतीने अन्य कोणत्याही महत्वाच्या एकाच सणासाठी खालीलप्रमाणे मंजूर केली जाईल.

| **अ.क्र.** | **उचल कोणत्या सेवकांना देता येईल** | **उचल रक्कम** | **वसुलीचे हप्ते** | **हमीपत्र आवश्यक आहे/नाही** |
|---|---|---|---|---|
| १. | कायम सेवेतील शिक्षक व शिक्षकेतर सेवक | रु.४०,०००/- **किंवा** रू.५०,०००/- | १० | नाही |
| २. | परीवीक्षा कालावधी / हंगामी सेवेतील नियमित वेतनश्रेणीतील शिक्षक व शिक्षकेतर सर्व सेवक आणि संशोधन सहायक | रु.४०,०००/- **किंवा** रू.५०,०००/- | १० | आहे (दोन कायम सेवकांची हमीपत्रे) |
| ३. | प्रशासन शिक्षकेतर कक्षामार्फत जाहिरातीव्दारे नेमण्यात आलेले एकत्रित वेतनावरील सेवक | रु.२०,०००/- | १० | आहे (दोन कायम सेवकांची हमीपत्रे) |

२) उचल घेतलेल्या रकमेची वसूली ज्या महिन्यात उचल दिली जाईल तो व त्यानंतरचा महिना सोडून येणाऱ्या महिन्यापासूनच्या वेतनामधून समान हप्त्यात केली जाईल. सदर उचल रकमेचा लाभ केवळ उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या सेवकांनाच लागू राहील.

दिवाळी सणासाठी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या सेवकांपैकी ज्यांना उचल रक्कम घेण्याची इच्छा असेल, त्यांनी आपले विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर Human Resource Management System - For Employee येथे जाऊन Login करुन उचल रकमेचा योग्य तो पर्याय निवडून दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावा. अ.क्र.२ व ३ मधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी (अ.क्र. १ वगळता) सदर अर्जाची प्रिंटआऊट वित्त व लेखा विभागातील वेतन कक्षास दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत सादर करावी. त्यानंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच देण्यात आलेल्या उचल रकमेची वसुली **डिसेंबर, २०२४** च्या वेतनापासून करण्यात येईल.

**(टिप** :- ऑनलाईन अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास विद्यापीठाच्या इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी सेलमध्ये १८६८ या क्रमांकावर संपर्क साधावा.)

27/9/24

**(प्रा.(डॉ.)अविनाश कुंभार)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र.एएन/ 3620
दिनांक :- 30 SEP 2024

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

यांना विनंती की वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.